# गणेशोत्सवाच्या निमित्ताने वाघ बकरी टीने खास विदर्भाची खासियत असलेला "एक्स्ट्रा स्ट्राँग" मिलि डस्ट चहा दाखल केला



अकोला | प्रिमियम वाघ बकरी चहा, स्ट्राँग मिलि चहा, नवचेतन चहा आणि इंटरनॅशनल गुड मॉर्निंग चहाचा विपणनकर्ता असलेल्या वाघ बकरी टी ग्रुपला विदर्भ आणि अवघ्या महाराष्ट्रातील चहाच्या ब्रँड्समध्ये पसंती दिली जात आहे.

वाघ बकरी ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक आणि या ग्रुपचे ३ ऱ्या पिढीचे उद्योजक रासेश देसाई म्हणाले, ''एक्स्ट्रा स्ट्राँग मिलि डस्ट चहा ही विदर्भाची खासियत आहे. या चहाकरिता आम्ही अतिशय विस्तृत असे उपभोक्ता संशोधन केलेले आहे आणि विदर्भ भागामध्येच प्रति महिना ६५० टन चहाची मागणी असेल असे वाटते.'' वाघ बकरी टी ग्रुपने ६ वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील बाजारपेठेत प्रवेश केला आणि आजतागायत त्यांना ग्राहकांची भरभरून पसंती मिळालेली आहे. महाराष्ट्र ही चहाची ६००० टनांची दर्जेदार बाजारपेठ आहे आणि पॅकबंद चहाच्या वर्गवारीमध्ये या ग्रुपने या बाजारपेठेतील १७ टक्क्यांहून अधिक वाटा काबीज केला आहे. मिलि हा वाघ बकरी टी ग्रुपच्या चहाचा २ रा मोठा ब्रँड आहे. हा ब्रँड चहापत्ती आणि भुकटी या दोन स्वरुपांमध्ये उपलब्ध आहे. गेली कित्येक वर्षे वाघ बकरी टी ग्रुपने आपल्या ग्राहकांना शुध्द आणि सर्वोत्तम दर्जाचा चहा देण्याची परंपरा जोपासली आहे. वाघ बकरी टी ग्रुप ही भारत सरकारच्या एनएबीएल (नॅशनल ॲक्रिडीटेशन बोर्ड फॉर टेस्टिंग ॲन्ड कॅलिब्रेशन लॅबोरेटरीज) लॅबोरेटरीचे प्रमाणन प्राप्त झालेली चहा वर्गवारीतील एकमेव कंपनी आहे.

वाघ बकरी टी ग्रुप हा एक प्रिमियम टी ग्रुप असून, १८९२ पासून चहा व्यवसायामध्ये याचे अस्तित्त्व आहे. आज ही ९०० कोटी रुपयांपेक्षा जास्त उलाढालीसह भारतातील तिसरी सर्वात मोठी पॅकेज्ड टी कंपनी आहे. तसेच हिचे ३० दशलक्षपेक्षा जास्त चहा वितरणाचे केजीज आहे. ग्रुप जगभरातील रिटेल ग्राहक आणि चहा निर्यातीमध्ये अग्रगण्य आहे. जगभरातील मोठ्या प्रमाणावरील वाघ बकरी चहा प्रेमिंसह हा खऱ्या अर्थाने जागतिक ब्रँड म्हणून उदयास आला आहे. कंपनी गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, दिल्ली व हैद्राबाद येथे अविवादितपणे बाजार उपस्थितीचा आनंद घेत आहे आणि हल्लीच हिने छत्तीसगढ व गोवा येथे प्रवेश केला आहे. इतक्या वर्षांपासून वाघ बकरी आणि यांच्या प्रामाणिक ग्राहकांमध्ये प्रेम व विश्वासाचे दृढ नाते निर्माण झाले आहे.